



# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com



**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०१ ● अंक : २२४ ● मंगळवार दि. २८ मे २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये

● Volum : 1 ● Issue : 224 ● Tuesday, 28 May 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-






रामचंदानी सुपर जायंट्सने पटकविले विजेतपद 3





'नॅशनल प्रिन्सिपल कॉनक्लेव्ह' संपन्न 4


# पोलीसांनो सुधरा रे

## पुण्यात उत्पादन शुल्क विभागात रवींद्र धंगेकर, सुषमा अंधारेंची धडक

- पबमधील गोरखधंद्याची यादीच वाचली
- 500 कोटींच्या वसुलीचा आरोप
- रवींद्र धंगेकर संतापले
- अधिकाऱ्यांनी सर्व आरोप फेटाळले



**पुणे (दै. आरंभ पर्व)**


पुण्यात उत्पादन शुल्क विभागात आमदार रवींद्र दांडेकर आणि सुषमा अंधारे यांनी आंदोलन करत अधिकाऱ्यांवर थेट आरोप केले आहेत. कोणत्या बार आणि पब मालकाकडून किती हप्ता दिला जातो तसेच कोणत्या अधिकाराला दिला जातो, याची यादीच आमदार रवींद्र धंगेकर आणि सुषमा अंधारे यांनी अधिकाऱ्यांसमोर वाचून दाखवली. यासंदर्भातले गंभीर आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागावर केले आहेत. मागच्या वर्षभरात पुणे जिल्ह्यातील बार आणि पब माध्यमातून 500 कोटी रुपयांची वसुली झाली असल्याचा आरोपही सुषमा अंधारे यांनी यावेळी केला आहे.

हातात खोके आणि पैसे घेत महाविकास आघाडीतील नेत्यांनी पुण्यात आंदोलन केले. पुण्याची अवस्था ही उडता पंजाब सारखी झाली असल्याचा आरोप यावेळी सुषमा अंधारे यांनी केला आहे. उत्पादक शुल्क विभागाची वसुलीची यादी वाचली तर ती लग्नातील आहेराची यादी वाचण्यासारखे असल्याचे देखील सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे. मागील वेळी ललित पाटील प्रकरणात देखील आम्ही या वसुलीचा आरोप केला होता. त्यावेळी मंत्री शंभूराज देसाई यांनी आमच्यावर गुन्हे दाखल करण्याची भाषा केली. ललित पाटील प्रकरणात देखील अजय तावरे यांचे नाव घेतले होते. यांच्या अटकेची मागणी केली होती. मात्र, वेगवेगळ्या खात्याच्या मंत्र्यांनी दबाव आणून हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. एकाही पोलिस अधिकाऱ्याशी आमचे वैर नाही. मात्र तुम्ही पुणेकरांच्या जीवाशी का खेळत आहात? असा सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला.

आमदार धंगेकर आरोप करत असतानाच संबंधीत पोलिस अधिकऱ्यांच्या वतीने स्पष्टिकरण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे आमदार रवींद्र धंगेकर चांगलेच संतापले.

एक आमदार म्हणून मी या ठिकाणी बोलायला आलो आहे. त्यामुळे मला शिकवू नका, असा कडक इशारा आमदार रवींद्र धंदेकर यांनी राज्य उत्पादन विभागातील अधिकाऱ्यांना दिला. तुम्ही विधानसभेत नाही तर माझ्यासमोर बोलत आहात. त्यामुळे मला शहाणपणा शिकवू नका, अशा शब्दात रवींद्र धंगेकर यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच सुनावले. पुणे शहरात सुरु असलेल्या अवैध बारची यादी आमच्या समोर द्या, या बारवर आजपर्यंत का कारवाई करण्यात आली नाही? असा सवाल देखील रवींद्र धंगेकर यांनी उपस्थित केला आहे.

आमदार रवींद्र धंगेकर आणि आणि सुषमा अंधारे यांनी आमच्यावर केलेले आरोप पूर्णपणे चुकीचे असल्याचा दावा संबंधीत अधिकाऱ्यांनी या वेळी माध्यमांसमोर केला. तरी देखील या विभागाचा जिल्हा प्रमुख म्हणून अशा पद्धतीने काही असेल तर याबाबत चौकशी करण्यात येईल आणि यामध्ये दोष असणाऱ्या व्यक्तीवर तात्काळ कारवाई केली जाईल, असे आश्वासन देखील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. यापूर्वी झालेल्या सर्व कारवाईपेक्षा दुपटीने कारवाई आमच्या विभागाकडून गेल्या वर्षभरात झाली आहे. आमच्या विभागाकडून आठ हजार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, असा दावा देखील अधिकाऱ्यांनी केला. आणि दुपटीने मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याचा दावा देखील अधिकाऱ्यांनी केला आहे. पुणे विभागातून 500 कोटींपेक्षा जास्त महसूल राज्य शासनाला उपलब्ध करून दिला असल्याचे अधिकाऱ्यांनी या वेळी सांगितले आहे.







# पोर्शे अपघातानंतर पुन्हा पुणे हादरलं!

## ट्रकने महाविद्यालयीन तरुणांना चिरडले, 2 जणांचा मृत्यू, 1 जखमी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यात पोर्शे अपघातानंतर आणखी एक मोठा अपघात झाला आहे. नगर रस्त्यावर खराडी जकात नाका येथे भरधाव ट्रकने दुचाकीला चिरडले. त्यात दोन महाविद्यालयीन तरुणांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात रात्री साडेदहाच्या सुमारास झाला. हे दोन महाविद्यालयीन युवक मूळचे लातूरचे असून ते सध्या वाघोली येथे शिक्षण घेत होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. मालवाहतूक ट्रक वाघोलीतून पुण्याच्या दिशेने येत होता यावेळी खराडीतील जकात नाका चौकात हा अपघात घडला. याप्रकरणी ट्रक ड्रायव्हरला ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. श्यामबाबू रामफळ गौतम असे चालकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौतम हा त्याचा ट्रक (MH 12 VF 6441) घेऊन चंदन नगरच्या दिशेने जात होता. जकात नाका येथे सिग्नल वर थांबलेल्या मोटरसायकला त्याने मागून जोरात धडक दिली. त्यामध्ये मोटरसायकल वरील असणारे 3 जण फरफटत गेली. या अपघातात 2 जणांचा मृत्यू झाला तर 1 जण जखमी आहे. आदिल शेख असे एका तरुणाचे नाव असून इतर दोघांचे नाव समजू शकलेले नाही. घटनास्थळावरून ट्रक चालक याला ताब्यात घेऊन त्याची ससून हॉस्पिटल येथे वैद्यकीय तपासणीसाठी नेले आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत



पुण्यातील रस्ते अपघाताची संख्या वाढत आहे. कल्याणी नगरमध्ये भरधाव वेगात आलेल्या पोर्शे कारने मोटारसायकलला धडक दिल्याने दोघांचा मृत्यू झाला होता. दारूच्या नशेत 17 वर्षीय अल्पवयीन कार चालवत होता. याप्रकरणी रोज नवनवीन खुलासे होत आहेत. आता पुणे पोलिसांनी अल्पवयीन मुलाच्या रक्ताच्या नमुन्याशी छेडछाड करून पुरावे नष्ट केल्याप्रकरणी दोन डॉक्टरांना अटक केली आहे.






# हवामान बदलामुळे रोगराईत वाढ





माणूस ज्या प्रकारे पृथ्वीचे शोषण करत आहे, त्याच प्रमाणात स्वतःच्या विनाशाचा मार्ग तयार करत आहे. मानवामुळे होणारे प्रदूषण, हवामानातील बदल, जैवविविधतेचे नुकसान, परकीय प्रजातींचे आक्रमण आणि अधिवासांचे नुकसान यामुळे पृथ्वी मानवासह अनेक जीवांसाठी निर्जन बनली आहे. त्यामुळे अनेक संसर्गजन्य आजार झपाट्याने पसरत आहेत. ते मानवाप्रमाणेच प्राणी आणि वनस्पतींनाही धोका निर्माण करत आहेत. जलवायू परिवर्तनाचा परिणाम सखोल समजून घेण्यासाठी नॉट्रेडेम विद्यापीठातील संशोधकांच्या नेतृत्वाखाली एक नवीन अभ्यास केला गेला. त्याचे परिणाम 'नेचर' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. शास्त्रज्ञांनी याआधी काही रोगांच्या वाढत्या प्रकरणांवर आणि पर्यावरणातील बदलांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यात मलेरियासारख्या आजारांचा समावेश आहे. मलेरिया पसरवण्यात हवामानबदलाची मोठी भूमिका आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेदेखील त्याला दुजोरा दिला आहे. डास उष्ण आणि कोरड्या हवामानात वाढतात. दुसरीकडे, त्यांचा नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे हे रोगकारक जीव मानवी वस्तीच्या जवळ येत आहेत. परिणामी, या रोगांचा धोका वाढत आहे. मलेरियाच्या बाबतीत अशी अनेक उदाहरणे आहेत, जिथे यापूर्वी कधीही मलेरिया या रोगाचा धोका दिसला नव्हता पण आता पसरत आहे. वन्य जीव विविधतेत घट झाल्यामुळे उत्तर अमेरिकेतही लाइम रोगाची प्रकरणे वाढू शकतात. नॉट्रेडेम विद्यापीठाशी निगडित संशोधकांच्या नेतृत्वाखालील अभ्यासकांनी हवामान आणि पर्यावरणावरील वाढत्या मानवी प्रभावामुळे गुंतागुंतीच्या समस्या कशा निर्माण होत आहेत, याचा सखोल अभ्यास केला आहे. अभ्यासाशी संबंधित संशोधकांनी लिहिले की, आम्हाला माहीत आहे की, संसर्गजन्य रोग वाढत आहेत आणि मानव वातावरणात व्यापक बदल करत आहेत. संसर्गजन्य रोगांचा परिणाम केवळ मानवावरच नाही, तर इतर प्राणी आणि वनस्पतींवरही होत आहे. या अभ्यासात, संशोधकांनी संसर्गजन्य रोग जागतिक बदलांना कसा प्रतिसाद देतात हे समजून घेण्यासाठी आठ वेगवेगळ्या भाषांमधील 972 पूर्व-अस्तित्वातील अभ्यासातून 2,938 निरीक्षणांचे विश्लेषण केले. या अभ्यासात वनस्पती, प्राणी आणि मानवांवर परिणाम करणारे यजमान आणि परजीवी यांचे 1,497 संयोजन समाविष्ट होते. त्यांच्या विश्लेषणात शास्त्रज्ञांनी पाच घटकांवर लक्ष केंद्रित केले आहे, जे जगभरातील पर्यावरणात मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणत आहेत. यामध्ये जैवविविधतेचे नुकसान, हवामानबदल, रासायनिक प्रदूषण, परकीय प्रजातींचा प्रसार, नैसर्गिक अधिवासातील बदल आणि होणाऱ्या नुकसानाचा समावेश आहे. या अभ्यासात हवामान बदलामुळे वाढणारे तापमान, सरासरी तापमान आणि पावसात होणारे बदल यांचा समावेश आहे. याशिवाय नैसर्गिक अधिवासांना झालेल्या हानीमध्ये जंगलांचे तुकडे होणे, शहरीकरण आदींच्या अभ्यासानंतर शास्त्रज्ञ या निष्कर्षापर्यंत पोहोचले आहेत की, संसर्गजन्य रोग पसरण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे जैवविविधता नष्ट होणे. त्यामुळे या आजारांचा प्रसार वेगाने होत आहे. नवीन परदेशी प्रजातींचा उदय, हवामानातील बदल आणि रासायनिक प्रदूषण ही जगातील संसर्गजन्य रोगांच्या प्रसाराची सर्वात मोठी कारणे मानली जातात. संशोधनानुसार या बदलांमुळे काही रोग पसरण्याच्या अधिक शक्यता निर्माण होत आहेतच; पण त्यांच्या प्रसाराच्या पद्धतीही बदलत आहेत. मानव आणि इतर सजीवांमध्ये संसर्गजन्य रोगांच्या वाढत्या प्रसारामुळे रोगांचा धोका वाढत आहे. याशिवाय झाडे आणि पिकांवरील रोगांचे प्रमाण वाढल्याने शेती, अन्नसुरक्षा आणि जैवविविधतेला धोका निर्माण होत आहे. या अभ्यासाशी संबंधित संशोधक जेसन रोहर यांनी म्हटले आहे की, पर्यावरणात झालेल्या अनेक बदलांमुळे प्राणी आणि मानवांमध्ये परजीवी वाढतात. याचा अर्थ असा की, या बदलांमुळे प्राण्यांपासून मानवांमध्ये अधिक रोग पसरू शकतात. तसेच या कारणांमुळे साथीचा धोका वाढू शकतो. शास्त्रज्ञांनी संशोधनात म्हटले आहे की, भविष्यात रोगांचे परिणाम अधिक व्यापक होतील. त्यामुळे वाढते उत्सर्जन कमी करण्याची तातडीची गरज अधोरेखित होत आहे. संशोधकांच्या म्हणण्यानुसार हवामानातील बदलामुळे आणि तापमानवाढीमुळे रोग पसरवणाऱ्या जीवांसाठी अधिक अनुकूल वातावरण निर्माण होत आहे. शिवाय यामुळे त्यांचा प्रजनन कालावधीही वाढत आहे. अशा परिस्थितीत या परजीवींच्या वाढीमुळे रोगांचा प्रसार होण्याचा धोकाही वाढत आहे. त्याचप्रमाणे रासायनिक प्रदूषणामुळे जीवांच्या रोगप्रतिकारक शक्तीवर दबाव येतो. हवामानबदल प्राण्यांच्या हालचाली आणि निवासस्थानात बदल करू शकतो आणि त्यांच्या नवीन प्रजाती समोर आणू शकतो. हे रोगजनकांच्या प्रसारासाठी उपयुक्त ठरू शकतात. तथापि, मानव पृथ्वीवर घडवून आणत असलेले बदल केवळ संसर्गजन्य रोग वाढवत नाहीत, तर कमीदेखील करू शकतात. या अभ्यासातून समोर आलेली सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे नैसर्गिक अधिवास नष्ट होणे किंवा त्यांच्यात होणारे बदल संसर्गजन्य रोगांचा धोका कमी करू शकतात. तथापि, जंगलतोडीमुळे रोगराई वाढू शकते, ही कल्पनाही या अभ्यासातून नाकारलेली नाही. तथापि, त्याऐवजी काही परिस्थितींमध्ये धोका वाढू शकतो आणि इतरांमध्ये अधिवास आणि जंगलाचा नाश झाल्यामुळे धोका कमी होऊ शकतो. जंगलांचा नाश मलेरियापासून इबोलापर्यंतच्या रोगांचा धोका वाढवू शकतो. या नवीन अभ्यासानुसार शहरीकरण होत आहे, तसतसे स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थाही सुधारत आहे. त्यामुळे संसर्गजन्य रोगांचे प्रमाण कमी होत आहे. अशा परिस्थितीत, जागतिक बदल परतवणे त्यांचे वाढणारे दुष्परिणाम दूर करण्यासाठी पुरेसे ठरेल का, हा मोठा प्रश्न आहे. संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी मर्यादित संसाधनांसह जागतिक बदलांवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. संशोधकांनी याला सामोरे जाण्याचे मार्ग ठळक केले. उत्सर्जन कमी करणे, परिसंस्थेचे संरक्षण करणे आणि जैविक आक्रमणांना प्रतिबंध करणे या उपायांमुळे जैवविविधतेचे नुकसान कमी होऊन वनस्पती, प्राणी आणि मानवांमधील रोगांचे ओझे कमी होण्यास मदत होऊ शकते. चांगल्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची सांगड घालणे आणखी प्रभावी ठरू शकते. मानवी क्रियाकलापांमुळे वाढते प्रदूषण, हवामान बदलामुळे जैवविविधता आणि पर्यावरणाची हानी, परकीय प्रजातींचे आक्रमण आणि अधिवासांचे नुकसान यामुळे अनेक संसर्गजन्य रोग वेगाने पसरत आहेत. हे रोग मानवांसाठीच नाही, तर इतर प्राणी आणि वनस्पतींसाठीही धोकादायक आहेत. हवामानबदलामुळे वाढते तापमान, सरासरी तापमान आणि पावसाच्या पद्धतीत होणारे बदल यांचाही या अभ्यासात समावेश होता. पर्यावरणात झालेल्या अनेक बदलांमुळे प्राणी आणि मानवांमध्ये परजीवी वाढतात. याचा अर्थ असा की, या बदलांमुळे प्राण्यांपासून मानवांमध्ये अधिक रोग पसरू शकतात. तसेच या कारणांमुळे साथीचा धोका वाढू शकतो. या पार्श्वभूमीवर पाणी डोक्यावरून जाण्यापूर्वी आपण सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. भारतातही हवामानातील बदल, विशेषत: तापमान आणि आर्द्रतेतील बदल, काही भागात अतिवृष्टी आणि काही भागांत दुष्काळामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रसार वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. भारतातील अनेक भागांमध्ये एच2 एन 3, एडेनोव्हायरस आणि स्वाइन फ्लूसह श्वसन संक्रमणांमध्ये अलीकडे वाढ झाल्याने चिंता वाढली आहे; मात्र या सगळ्यांसाठी हवामान बदलाला जबाबदार धरणे घाईचे होईल. वातावरणातील बदलामुळे डेंगी, चिकुनगुनिया, मलेरिया या आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. सतत वाढत जाणारे तापमान विषाणूंच्या प्रसाराच्या पद्धतीवर परिणाम करतात आणि रोग पसरवणाऱ्यांवरही अनेक प्रकारे परिणाम करते. बदलती हवामान परिस्थिती विषाणूंच्या क्षमतेला आणि त्यांच्यामुळे पसरणाऱ्या रोगांना अधिक अनुकूल बनवते. उबदार आणि दमट परिस्थिती रोग पसरवण्याचे मार्ग, रोगाची वारंवारता आणि तीव्रता या दोन्हींवर परिणाम करू शकतात. हवामानातील बदलांमुळे प्रजातींच्या निवासस्थानात बदल होतो. काही प्रजाती नवीन विषाणूंना अधिक संवेदनक्षम बनवू शकतात. त्यामुळे त्यांची लोकांमध्ये पसरण्याची क्षमता वाढू शकते. उदाहरणार्थ, देशाच्या कोरड्या भागात अतिवृष्टी आणि पूर यामुळे रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. सामान्यत: हे ओल्या भागात होत असते. यामुळे कॉलरा आणि आमांश यांसारखे जलजन्य रोग तसेच मलेरिया, डेंगी आणि चिकनगुनियासारखे रोग वाढतात, असा या संशोधकांचा निष्कर्ष आहे.

# दुसऱ्या पर्वासाठी रत्नागिरी जेट्स संघाच्या जर्सीचे अनावरण

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र प्रिमियर लीगच्या (एमपीएल) दुसऱ्या पर्वासाठी गतविजेत्या रत्नागिरी जेट्स संघाच्या नव्या जर्सीचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी रत्नागिरी जेट्स संघाचे मालक व जेटसिंथेसिस कंपनीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजन नवानी, कंपनीचे वित्त संचालक राकेश नवानी, सह संघमालक महिंद्र लुल्ला, फ्लिटगार्ड फिल्टर्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक निरंजन किर्लोस्कर, रत्नागिरी जेट्स संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रफुल चंदावरकर, मुख्य प्रशिक्षक रणजीत पांडे, कर्णधार अझिम काझीसह संघातील अन्य सर्व खेळाडू उपस्थित होते. दुसऱ्या पर्वाच्या मोहिमेस रत्नागिरी जेट्स संघ 2 जून रोजी कोल्हापूर टस्कर्स बरोबरच्या लढतीने सुरुवात करणार आहे. या दोन संघातच पहिल्या पर्वाची अंतिम लढत झाली होती.

संघाच्या नव्या जर्सीत विशाल आणि शक्तिशाली समुद्राचे प्रतिक दाखविणाऱ्या निळ्या रंगाचा समावेश असून, हा रंग आमची ताकद आणि लवचिकता दर्शवितो. जर्सीच्या समोरच्या बाजूवर असणारा एक सुवर्ण तारा आमच्या गतवर्षीच्या विजेतेपदाची आम्हाला आठवण करून देतो आणि नव्या मोहिमेसाठी प्रेरित करतो. याखेरीज जर्सीवर कोरण्यात आलेली सोनेरी रंगाची जेट्स आमच्या संघात असलेली गतीशील उर्जा आणि सामर्थ्याचे दर्शन घडवते.

रत्नागिरी जेट्सचे ध्येय उच्च आणि उत्कृष्टता उद्दिष्ट असा आहे. जेटसिंथेसिस संघाच्या वर्षभरातील विकासावर विश्वास ठेवतो आणि भविष्यात सर्वोत्तम कामगिरी करू शकणाऱ्या खेळाडूंचा सातत्याने शोध घेत असतो. आम्ही संघाला शुभेच्छा देतो, असे रत्नागिरी जेट्स संघाचे मालक राजन नवानी यांनी सांगितले.

सचिन सागा रियल क्रिकेट आणि स्कायईस्पोर्ट्स, डिजिटल एंटरटेन्मेंट आणि वेलनेस अशा नावाने कंपनीने ई-स्पोर्टससारख्या महत्वाच्या क्षेत्रामध्ये जागतिक स्तरावर पदार्पण केले आहे. रत्नागिरी जेट्स संघ आपल्या भागात क्रिकेट तळागाळात रुजविण्यासाठी कटिबद्ध आहे. जेट्स क्लबच्या एकत्रित प्रयत्नांना याचे श्रेय जाते. संघाकडे वरिष्ठ खेळाडूंबरोबरच 14, 16, 19 आणि 23 वर्षांखालील गटातील खेळाडूंनाही करारबद्ध करण्यात आले आहे.

एमपीएलच्या नव्या पर्वातील नव्या आव्हानांसाठी आम्ही सज्ज आहोत. आमचा खेळाडूंवर पूर्ण विश्वास असून, या नव्या पर्वात सर्वोत्तम कामगिरीसाठी आम्ही संघाला शुभेच्छा देतो, असे संघ मालक राकेश नवानी यांनी सांगितले.

क्रांती डिस्ट्रिब्युटर्स हे या संघाचे सह संघमालक असून फ्लिटगार्ड फिल्ट्रम कंपनी हे या संघाचे प्रायोजक आहेत. अझिम काझीच्या नेतृत्वाखालील संघात अभिषेक पवारसह (यष्टीरक्षक) अखिलेश गवळे, धीरज फटांगरे, दिव्यांग हिंगणेकर, किरण चोरमले, क्रिश शहापूरकर, कुणाल थोरात, निखिल नाईक (यष्टीरक्षक), निकित धुमाळ, पियुष कमल, प्रदीप दाढे, रोहित पाटील, साहिल चुरी, संग्राम भालेकर, सत्यजीत बच्छाव, तुषार श्रीवास्तव, वैभव चौघुले, विजय पवळे, यश बोरकर, योगेश चव्हाण यांचा समावेश आहे.



लिलाव आणि तयारीसाठी वेळ मिळाल्यानंतर, महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या आगामी आवृत्तीसाठी आमचा संघ अत्यंत संतुलित आणि सज्ज आहे. आमची विचारधारा नेहमीच सर्वोत्कृष्ट क्षमतेनुसार खेळण्याची राहिली आहे, तीच आम्हाला पहिल्या आवृत्तीत विजेतेपदापर्यंत घेऊन गेली आणि आम्ही त्याच पद्धतीने खेळत राहण्यास उत्सुक आहोत. रत्नागिरी जेट्सने नेहमीच प्रक्रिया आणि तयारीला महत्व दिले आहे आणि हंगाम सुरू होण्यापूर्वी झालेल्या सर्व कामांवर आम्हाला विश्वास आहे, असे संघाचे प्रशिक्षक रणजीत पांडे यांनी सांगितले. आम्ही लीगची वाट पाहत आहोत, तयारी उत्कृष्ट झाली आहे. सामना सुरू झाल्यावर प्रत्येककजण त्यांच्या भूमिकेची जबाबदारी पार पाडण्यासाठी सज्ज आहे. पहिल्या आवृत्तीत चाहत्यांकडून जसे पाठबळ मिळाले, तसेच याही पर्वात मिळेल, असे कर्णधार अझिम काझी म्हणाले.

## रत्नागिरी संघाचे सामने -

- 2 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध कोल्हापूर टस्कर्स (सायंकाळी 7 वा.)
- 4 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध ईगल नाशिक टायटन्स (दुपारी 2 वा.)
- 5 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध छत्रपती संभाजी किंग्स (सायंकाळी 7 वा.)
- 6 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध रायगड रॉयल्स (सायंकाळी 7 वा.)
- 8 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध पुणेरी बाप्पा (दुपारी 2 वा.)
- 9 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध कोल्हापूर टस्कर्स (दुपारी 2 वा.)
- 11 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध ईगल नाशिक टायटन्स (सायंकाळी 7 वा.)
- 12 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध छत्रपती संभाजी किंग्स (सायंकाळी 7 वा.)
- 14 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध रायगड रॉयल्स (दुपारी 2 वा.)
- 16 जून 2024 : रत्नागिरी जेट्स विरुद्ध पुणेरी बाप्पा (सायंकाळी 7 वा.)

# पदवी अभ्यासक्रमांसाठी अर्ज प्रक्रियेला सुरूवात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सोमैय्या विद्याविहार युनिव्हर्सिटी, मुंबई या भारतातील शैक्षणिक विकास आणि सर्वांगीण वाढीसाठी ओळखल्या जाणाऱ्या ख्यातनाम संस्थेने महाराष्ट्र एचएससी बोर्ड 2024 निकालांच्या घोषणेनंतर पदवी अभ्यासक्रमांसाठी अर्ज प्रक्रिया सुरु केली आहे. एसव्हीयू मुंबईच्या विविध महाविद्यालयांमधून अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वाणिज्य, विज्ञान, डिझाइन, शिक्षण, विज्ञान, क्रीडा आणि संगीत अशा विविध अभ्यासक्रमांमध्ये 31 पदवी अभ्यासक्रम चालवले जातात. इच्छुक विद्यार्थी अधिकृत नोंदणी लिंक (official registration link या अधिकृत नोंदणी लिंकद्वारे या अभ्यासक्रमांसाठी अर्ज दाखल करू शकतात.

बोर्डाचे निकाल जाहीर झाल्यानंतर नोंदणी प्रक्रिया सुरु झाल्याबद्दल बोलताना सोमैया विद्याविहार युनिव्हर्सिटी, मुंबईचे कुलगुरू तसेच यूजीसीचे माजी अध्यक्ष प्रा. (डॉ.) व्ही. एन. राजशेखरन पिल्लई म्हणाले की, "महाराष्ट्र बोर्डाचे बारावीचे निकाल जाहीर झाल्यानंतर सोमैया विद्याविहार युनिव्हर्सिटी मुंबईमध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी नोंदणी सुरु झाल्याची घोषणा करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. एसव्हीयूमध्ये आम्ही एक सर्वांगीण शैक्षणिक अनुभव देण्यासाठी वचनबद्ध आहोत. एक ताजा दृष्टीकोन आणि विचार आणणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. हे विद्यार्थी या प्रवासात आमच्यासोबत येत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांच्या शिक्षणात योगदान देऊ आणि भविष्यातील नेतृत्व म्हणून त्यांच्या वाढीला चालना देऊ. एक उज्ज्वल भवितव्य एकत्र निर्माण करण्यासाठी आपण या संधीचा फायदा घेऊया."

एसव्हीयू मुंबईमध्ये विविध प्रकारची प्रतिष्ठित महाविद्यालये आहेत. त्यातील एस. के. सोमैया कॉलेज प्रतिष्ठीत आहे आणि के. जे. सोमैया कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग आपल्या प्रभावी प्लेसमेंट रेकॉर्डसाठी ओळखले जाते. इथल्या विद्यार्थ्यांना मायक्रोसॉफ्ट, गुगल इत्यादींसारख्या कंपन्यांकडून वार्षिक रु.58 लाखांपर्यंत पॅकेजेस देण्यात आली आहेत. युनिव्हर्सिटीच्या माजी विद्यार्थ्यांनी डन्झो आणि फार्मईझी अशा प्रतिष्ठित स्टार्टअप कंपन्या सुरु केल्या आहेत.




एसव्हीयूकडून न्यू एज्युकेशन पॉलिसी (एनईपी) २०२० च्या अनुषंगाने तीन ते चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जातात. बहुशाखीय इलेक्टिव्ह आणि मायनर्ससोबत विद्यार्थ्यांना ऑनर्स पदवी घेता येते. ही युनिव्हर्सिटी १० टक्के स्कॉलरशिप सीट्स देते आणि तिने ५० पेक्षा जास्त ख्यातनाम आंतरराष्ट्रीय युनिव्हर्सिटीजसोबत भागीदारी केली आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी अतिरिक्त शिक्षण शुल्क न भरता सेमिस्टर अॅब्रॉड ऑप्शनदेखील वापरता येईल.

एसव्हीयू आपल्या शैक्षणिक सर्वोत्तमता, नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम आणि सर्वांगीण विकासासाठी ओळखली जाते. विविध क्षेत्रांमध्ये विविध प्रकारचे अभ्यासक्रम देणारी ही युनिव्हर्सिटी एक डायनॅमिक अध्ययन वातावरण देते ज्यातून बौद्धिक आणि वैयक्तिक वाढीला प्रोत्साहन देते. अनुभवी शिक्षकवर्ग, उत्तम दर्जाच्या सुविधा आणि मुंबईतील सर्वात मोठ्या कॅम्पससह एसव्हीयू विद्यार्थ्यांना आपापल्या क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करून समाजात सकारात्मक योगदान देण्यासाठी सुसज्ज करते.

# थोडक्यात



## मराठी संस्कृतीच्या विविध पैलुतून उलगडले सावरकर

**पुणे (आरंभ पर्व) :** संत मुक्ताई - कान्होपात्रा यांचे अभंग, बहिणाबाईंच्या कविता, ओव्या आदींच्या माध्यमातून मराठी संस्कृतीची ओळख घडवत व स्वातंत्र्यवीर सावकार यांच्या जीवनातील विविध पैलू उलगडत आज स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना आदरांजली वाहण्यात आली. निमित्त होते स्वातंत्र्यवीर सावरकर फाऊंडेशनच्या वतीने सावरकरांच्या जयंती निमित्त आयोजित तीन दिवसीय 'स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती महोत्सव 2024' चे. यामध्ये आज 'माय बोली साजिरी' या संस्कृतीवर्धक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अभंग, कविता, ओव्या, म्हणी, उखाणे, गाणी, संत साहित्य, शस्त्रास्त्र, वाद्य, पेहराव आदी विषय या अभिवाचनात्मक कार्यक्रमात मांडण्यात आले. लेखक राजीव बर्वे, बाल साहित्यिका संगीता बर्वे, मेघा विश्वास आणि स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रितम थोरवे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी भाजप युवा मोर्चा प्रदेश उपध्यक्ष कुणाल टिळक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला शंखनाद करून गणेश स्तवन सादर करण्यात आले. त्यानंतर 'अनादी मी अनंत मी..', अथर्वशीर्ष, विष्णू स्मरण, वासुदेवाची गाणी, बहिणाबाई चौधरी यांच्या कविता, 'हा नमस्कार महाराष्ट्राचा..' हे गीत, मुक्ताई - कान्होपात्रा यांचे अभंग, सुधीर मोघे यांची 'शब्द' ही कविता, संगीत 'संन्यस्त खड्ग' नाटकातील 'मर्म बांधातील ठेव ही..' हे नाट्य संगीत सादर करून कलाकारांनी उपस्थितांची मने जिंकली.

## यामाहाने पुण्यात आयोजित केला द कॉल ऑफ ब्लू वीकेण्ड इव्हेण्ट

**पुणे (आरंभ पर्व) :** इंडिया यामाहा मोटर प्रायव्हेट लिमिटेडने (आयवायएम) आपल्या सध्या चाललेल्या खिळवून ठेवणाऱ्या ब्रॅण्ड अभियानाखाली पुण्यात आज 'द कॉल ऑफ द ब्लू' (सीओटीबी) हा सप्ताहांत उपक्रम आयोजित केला. वारजे येथील आरएमडी सिंहगड कॉलेज हे स्थळ 1000 यामाहा चाहत्यांच्या उत्साहाने उपस्थित होते. यामध्ये ब्लू स्ट्रीक्स समुदायाचाही सहभाग होता. या असामान्य सोहळ्यात भाग घेण्यासाठी सगळे एकत्र जमले होते. या सोहळ्याच्या निमित्ताने यामाहाच्या चाहत्यांना ब्रॅण्डच्या अव्वल दर्जाच्या टू-व्हीलर्सचा अनुभव प्रत्यक्ष घेण्याची मुभा मिळाली. या वाहनांमधील अत्याधुनिक तंत्रज्ञान तसेच कामगिरी व सुरक्षितताविषयक सुविधांवर यामध्ये प्रकाश टाकण्यात आला. शिवाय, जिमखाना राइड व वूडन प्लांक चॅलेंज यांसारख्या उपक्रमांमुळे सहभागी झालेल्यांनाही त्यांची कौशल्ये दाखवण्याची आणि त्यांच्या क्षमता अधिक सफाईदार करण्याच्या दृष्टीने तज्ज्ञांकडून सूचना प्राप्त करण्याची संधी मिळाली. या आंतरक्रियात्मक व्यासपीठामुळे सोहळ्याला उपस्थित राहिलेल्यांमध्ये सहकार्याची व समुदायाची भावना रुजवण्यात मदत झाली, यामाहा आणि मोटरसायकलिंग यांवरील प्रेमाने त्यांना परस्परांशी जोडले.

# थोडक्यात



## जगण्यातील सकारात्मकता देते परिस्थितीशी संघर्ष करण्याची उमेद

- माधुरी ताम्हणे यांचे मत
- वंचित विकास संस्थेतर्फे 'अभया'चा दहावा वर्धापनदिन व दशकपूर्ती 'अभया सन्मान' सोहळा

**पुणे (आरंभ पर्व) :** "समाजातील प्रत्येक महिला विविध घाव सोसत असते. प्रत्येकीच्या संघर्षाचे स्वरूप वेगळे असेल. पण जीवनात संघर्ष येतोच. अशावेळी आपल्या जगण्यातील सकारात्मकता, धैर्याने सामोरे जाण्याची वृत्ती आणि मनातील कणखरपणा परिस्थितीशी दोन हात करण्याची उमेद देतो," असे मत लेखिका श्रीमती माधुरी ताम्हणे यांनी व्यक्त केले. वंचित विकास संचालित 'अभया' या एकल महिलांच्या मैत्रीगटाचा दहावा वर्धापनदिन व दशकपूर्ती अभया सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या. कर्वे रस्त्यावरील अश्वमेध हॉलमध्ये झालेल्या उन्मेष प्रकाशनच्या संचालक श्रीमती मेधा राजहंस, वंचित विकासचे अध्यक्ष विजयकुमार मर्लेचा, कार्यवाह संचालक मीना कुर्लेकर, संचालिका सुनीता जोगळेकर, मीनाक्षी नवले आदी उपस्थित होते. परिस्थितीशी दोन हात करून यशस्वी जिवन जगणाऱ्या महिलांचा सन्मान यावेळी करण्यात आला. बिबट्याशी झुंज देणाऱ्या सुनीता बनकर, तृतीयपंथी म्हणून येणाऱ्या अडचणींना तोंड देत तृतीयपंथीयांच्या आर्थिक स्थितीवर पीएचडी करणाऱ्या मिलिंद उर्फ मिलन लबडे, पतीच्या निधनानंतर अडचणींवर मात करून स्वतःला व कुटुंबाला उभे करणाऱ्या दैवशाला थोरबोले, ज्ञानदानातून हजारोंचे आयुष्य घडवणाऱ्या शोभा वाईकर, मुलांना वाढवताना संघर्ष करणाऱ्या वंदना अवघडे यांना अभया सन्मान, तर अयोध्येतील श्रीराम मंदिरात शंख वादन करणाऱ्या दीपिका जंगम यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. 'अभया'च्या कार्याची माहिती देणाऱ्या पुस्तकाचेही प्रकाशन झाले.



## ज्येष्ठ गायिका सुषमा देवी यांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत

**पुणे (आरंभ पर्व) :** आंबेडकरी चळवळीचा बुलंद आवाज असलेल्या ज्येष्ठ गायिका सुषमा देवी म्हणजे चालता बोलता भिमागीतांचा वारसाच. त्यांच्या गायकीने तळागाळातील जनते पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार पोहोचले. एक काळ असा होता की त्यांच्या भीमागीतांच्या कार्यक्रमांना लोक लाखोंच्या संख्येने गर्दी करत. मात्र त्यानंतर सोशल मीडिया आला, अनेक नवीन गायक उदयास आले अन् काळाच्या ओघात सुषमा देवी मागे पडल्या. आज त्यांच्यावर हालाकीची परिस्थिती ओढावली असून घराचे वीज बील भरण्यासाठी देखील त्यांच्याकडे पैसे नाहीत. याची दखल घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीच्या माध्यमातून पुणेकरांच्या वतीने सुषमा देवी यांना आर्थिक मदतीचा हात देण्यात आला आहे.

# रामचंदानी सुपर जायंट्सने पटकविले विजेतेपद

**पुणे (दै. आरंभ पर्व)** आसवानी क्रिकेट कप (एसीसी) 2024 स्पर्धेच्या तिसऱ्या पर्वाचे विजेतेपद रामचंदानी सुपर जायंट्स संघाने पटकाविले. पिंपरीतील मृणाल क्रिकेट ग्राउंडवर झालेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सुपर जायंट्स संघाने पिंपरी इंडियन्सवर 16 धावांनी विजय मिळवत 'एसीसी'च्या सोनेरी करंडकावर आपले नाव कोरले. महिलांच्या डॉजबॉल स्पर्धेत आसवानी रॉयल्स संघाने रॉयल चॅलेंजर्स वरुण संघावर विजय मिळवत स्पर्धेचा मुकुट जिंकला. 'ये है पिंपरी का त्योहार' चा नादघोष करत सिंधी बांधवानी स्पर्धेचा आनंद लुटला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना रामचंदानी सुपर जायंट्सने सलामीवीर हिमांशू




(तीन षटकारांसह 24 चेंडूत 30 धावा), कर्णधार करण आसवानी (20 चेंडूत 21 धावा), रौनक बात्रा (10 चेंडूत नाबाद 17 धावा) व हर्ष वाधवानी (9 चेंडूत 14 धावा) यांच्या तडाखेबाज फलंदाजीच्या जोरावर 12 षटकांत 4 बाद 98 धावा उभारल्या. मनीष नागदेव व दिनेश रिझवानी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

विजयासाठी 99 धावांचे लक्ष घेऊन मैदानात उतरलेल्या पिंपरी इंडियन्सची सुरुवात चांगली झाली. मात्र, ठराविक अंतराने फलंदाज बाद होत गेल्याने 11.1 षटकांत 82 धावांवर त्यांचा डाव संपुष्टात आला. कर्णधार धीरज मनवानी याने सर्वाधिक 15 धावा केल्या. जितू पहलानी व हरेश रेलवानी यांनी प्रत्येकी 12 धावा केल्या. इंडियन्सचे पाच खेळाडू धावबाद झाले. रौनक बात्रा, करण आसवानी व कमल जेठानी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. अष्टपैलू कामगिरी करणारा रौनक बात्रा सामनावीर ठरला.

विजेत्या रामचंदानी सुपर जायंट्स संघाला भव्य सुवर्ण करंडक आणि 5,55,555/- अधिक 2,00,000/- (घनश्याम सुखवानी व सागर सुखवानी) असे एकूण 7,55,555/- , तर उपविजेत्या पिंपरी इंडियन्सला रजत करंडक आणि 3,33,333/- रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले. डॉजबॉल स्पर्धेतील विजेत्या संघाला 1,11,111/- रुपयांचे, तर उपविजेत्या संघाला 55,555/- रुपयांचे रोख बक्षीस व करंडक देण्यात आले. पुरुषांमध्ये मनीष नागदेव (मॅन ऑफ द सिरीज) याला स्कोडा कुशक कार, तर महिलांमध्ये याकृत रांजझानी, सांची दुदानी, दीक्षा खुबचंदानी, मिश्टी तेजवानी, माही चावलानी (डॉजबॉल-वुमेन ऑफ द सिरीज) यांना चेतक स्मार्ट इलेक्ट्रिक स्कुटर देण्यात आले. स्पर्धेचे प्रमुख संयोजक आसवानी प्रमोटर्स अँड बिल्डर्सचे मालक श्रीचंद आसवानी म्हणाले, "जवळपास महिनाभर क्रिकेट व डॉजबॉल स्पर्धेचा आनंद घेतला. यंदा सिंधी समाजातील महिला आणि मुलींनाही खेळासाठी प्रोत्साहित केले. अतिशय उत्साहात आणि आनंदात ही स्पर्धा पार पडली. सिंधी समाजात खेळाचे महत्व वाढत असून, कुटुंबीय देखील या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी झाले. खऱ्या अर्थाने 'पिंपरी का त्योहार' या स्पर्धेच्या माध्यमातून आम्ही अनुभवला."

### संक्षिप्त धावफलक

रामचंदानी सुपर जायंट्स - (१२ षटकांत) ४ बाद ९८ (हिमांशू - २४ चेंडूत ३० धावा, करण आसवानी - २० चेंडूत २१, रौनक बात्रा - १० चेंडूत नाबाद १७ व हर्ष वाधवानी - ९ चेंडूत १४, मनीष नागदेव १-२७, दिनेश रिझवानी १-३०) विजयी विरुद्ध पिंपरी इंडियन्स - (११.१ षटकांत) ८ बाद ८२ (धीरज मनवानी १२ चेंडूत १५, जितू पहलानी ९ चेंडूत १२, हरेश रेलवानी ४ चेंडूत १२, कमल जेठानी १-९, करण आसवानी १-१६, रौनक बात्रा १-४०).

# महाराष्ट्रातील रीसायलेंट फार्मिंगसाठीचे व्हिजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)** जीएसपी क्रॉप सायन्स प्रायव्हेट लिमिटेड महाराष्ट्रातील कृषी बाजारपेठेत प्रवेश करण्याच्या तयारीत आहे. या राज्यात शेतकऱ्यांना अवेळी पाऊस, हवामानातील बदलाचा धोका आणि ढासळणारी मातीची गुणवत्ता अशा अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. महाराष्ट्रात नोव्हेंबर, डिसेंबर, फेब्रुवारी, एप्रिल आणि मे महिन्यांमध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली आहे. त्यामुळे रब्बी पिकाचे मोठे नुकसान होत आहे आणि हंगामी फळे, जी शेतकरी एप्रिल ते जून दरम्यान कर्ज फेडण्यासाठी विकतात आणि पेरणीच्या हंगामासाठी साहित्य खरेदी करतात. हे धोके ओळखून, या समस्येवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करणारे उपाय विकसित करण्यासाठी जीएसपीने सखोल संशोधन केले आहे. जीएसपी क्रॉप सायन्सचे कार्यकारी संचालक तीर्थ शाह यांच्या मते, महाराष्ट्रातील शेतीच्या शाश्वत उत्पादनासाठी या सर्व आव्हानांचा मुकाबला करणे, अत्यावश्यक आहे. या समस्येचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांनासानुकूलित उपाय उपलब्ध करून देणे करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. भारत हा त्याच्या अप्रयुक्त उत्पादन क्षमता आणि तांत्रिक कार्यबलासह देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कृषी रासायनिक मागणी पूर्ण करण्यासाठी मुख्य बाजारपेठ आहे.

# आरोग्य अधिकाऱ्यासाठी युवक काँग्रेसची बॅनरबाजी

**डॉ. भगवान पवार यांचे निलंबन मागे घ्यावे; युवक काँग्रेसचे रोहन सुरवसे यांची मागणी**

**पुणे (दै. आरंभ पर्व)** महानगरपालिकेतील आरोग्यप्रमुख डॉ. भगवान पवार यांचे निलंबन मंत्र्यांच्या दबावामुळे झाले आहे. मात्र, समस्त पुणेकर नागरिक डॉ. पवार यांच्या पाठीशी असून, त्यांचे निलंबन तात्काळ मागे घ्यावे, अशी मागणी करत युवक काँग्रेसच्या वतीने शहरात बॅनरबाजी करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे यांनी आरोग्य खात्याचा व संबंधित मंत्र्यांचा निषेध करत पुणेकर जनता डॉ. पवार यांच्या पाठीशी असल्याचे बॅनर लावले आहेत. तसेच त्यांच्यावरील कारवाई



मागे घेऊन त्यांना तात्काळ सेवेत रुजू करून घेण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

रोहन सुरवसे पाटील म्हणाले, "आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप व एका जुन्या तक्रारीला समोर ठेवून पवार यांचे निलंबन करण्यात आले आहे. मात्र, डॉ. पवार यांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून निलंबनाच्या कारवाईसंदर्भात काही गंभीर खुलासे केले आहेत. एका मंत्र्याने आपल्याला कात्रज येथील त्यांच्या कार्यालयात बोलावून नियमबाह्य टेंडरची कामे सांगितली. आरोग्य विषयक उपकरणे व इतर खरेदीत घोटाळा करण्याचा दबाव संबंधित मंत्र्याने टाकला. त्याला प्रतिसाद न दिल्याने सूडबुद्धीने निलंबनाची कारवाई केल्याचे डॉ. पवार यांनी या पत्रात म्हटले आहे."

> डॉ. पवार यांनी केलेले आरोप गंभीर स्वरूपाचे असून, त्यांच्यासारख्या प्रामाणिक अधिकाऱ्यावर खोट्या स्वरूपाचे घाणेरडे व गंभीर आरोप करुन त्रास देणाऱ्या संबंधित मंत्र्याचा राजीनामा मुख्यमंत्र्यांनी घेतला पाहिजे. निघेल तिथून पैसा उकळण्याचा प्रयत्न या मुजोर मंत्र्याकडून सुरु आहे. आपल्या कार्यालयात बोलावून अधिकाऱ्यांना दमदाटी करण्याचा प्रकार तालिबानी स्वरूपाचा आहे. डॉ. पवार यांना तात्काळ सेवेत रुजू करून घेतले नाही, तर आरोग्य मंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर युवक काँग्रेस कडून तीव्र आंदोलन करण्यात येईल.
>
> - रोहन सुरवसे-पाटील, सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस

# शेअर डॉट मार्केट माध्यमातून गुंतवणूकदारांना वेल्थबास्केट गुंतवणुकीचा नवा पर्याय सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व)** शेअर डॉट मार्केट हे फोनपे चे एक उत्पादन असून, ते वेल्थबास्केट या नव्या गुंतवणुकीच्या सोल्यूशनची ओळख करून देत आहे: वेल्थबास्केट हे एक स्टॉक बास्केट आणि ईटीएफ आहे, तसेच ते आमच्या सेबी नोंदणीकृत संशोधन शाखेद्वारे काळजीपूर्वक निवडण्यात आणि एकत्रित करण्यात आले आहे.




गुंतवणूकदार या नात्याने एखाद्याच्या पोर्टफोलिओसाठी उपलब्ध असलेल्या गुंतवणूक पर्यायांची विस्तृत श्रेणी नेव्हिगेट करणे नेहमीच आव्हानात्मक असते. गुंतवणूकदाराची आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोणता पर्याय वापरला जातो हे ओळखणे हेच मोठे आव्हान आहे. वेल्थबास्केटच्या गुंतवणुकदारांना विविध पर्याय उपलब्ध असतात, हे पर्याय सखोल संशोधनावर आधारलेले आणि गुंतवणूकदारांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी सोपे केलेले असतात.

वेल्थबास्केट हे युजरला फायदेशीर ठरणारे उत्पादन आहे. गुंतवणूकदार काही साइन अप करू शकतात आणि रु. 1000 पेक्षा कमी गुंतवणूक करण्यापासून सुरुवात करू शकतात.

वेल्थबास्केट केवळ वैयक्तिक स्टॉक निवडी आणि गुंतागुंतीचे विश्लेषण यासाठीच मदत करते असे नाही, तर हे उत्पादन विविध वर्गातील अ‍ॅसेट, सेक्टर, थीम आणि घटक यांनुसार विविध निवडीचे पर्याय देखील देते. यामुळे युजरच्या सध्याच्या होल्डिंगमध्ये वैविध्य येण्यास मदत होते.

या माध्यमातून भारतातील 250 सगळ्यात मोठ्या आणि सर्वात विश्वासार्ह कंपन्यांमध्ये ETF द्वारे गुंतवणूक करते, यात स्थैर्य आणि विकास संतुलित प्रमाणात होते.

तसेच एव्हरग्रीन हाय ग्रोथ वेल्थबास्केट रिफंड, संरक्षण आणि स्थिरता यामधील खात्रीशीर संतुलन राहावे म्हणून सोने, लोन आणि इक्विटी दरम्यान स्विच करते.

स्मार्ट मोमेंटम वेल्थबास्केट वरच्या ट्रेंडसह मोमेंटम स्टॉक कॅप्चर करते, तर या वेल्थबास्केट मधील मूल्य घटक अवमूल्यन झालेले स्टॉक ओळखतात आणि मार्केटमध्ये चांगला रिफंड देण्याच्या उद्देशाने गुणवत्ता घटक भक्कम असल्याची खात्री करतो. वेल्थबास्केट मध्ये लॉक इन कालावधी नसतो, ज्यामुळे गुंतवणूकदार कोणत्याही वेळी सहज पैसे काढू शकतात.

वेल्थबास्केट बद्दलचा दृष्टीकोन शेअर करताना, शेअर डॉट मार्केट चे कार्यकारी अधिकारी उज्ज्वल जैन म्हणाले, "शेअर डॉट मार्केट मध्ये आम्हाला भारतातील गुंतवणूकदारांना सहज आणि सोप्या सोल्यूशन्ससह सुसज्ज करणे हा आमचा दृष्टीकोन आहे, यामुळे संपत्ती निर्मितीचा मार्ग मोकळा होणार आहे.

वेल्थबास्केट मुळे गुंतवणूक अतिशय नेटकी होती. आमच्या संशोधनाच्या शाखेद्वारे अमर्यादित अनुभव आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळते. वेल्थबास्केटच्या माध्यमातून आम्ही केवळ पोर्टफोलिओच बदलत नाही; आम्ही गुंतवणुकीच्या भविष्याला आकारही देत आहोत."

# पावसाळ्यात साजरे होणारे गोव्यातील सण

**(दै. आरंभ पर्व)** बहावा वृक्ष बहरला की पावसाचं आगमन झालंच म्हणून समजा. गोव्यातल्या पावसाची तर मजाच न्यारी. फेसाळणारा समुद्र, हिरवागार शालूने जणू नटलेला निसर्ग, यामध्ये भर पडते ती इथल्या सणांची. विविध संस्कृतींचे दर्शन घडविणारे गोव्यातील सण हे इथल्या मान्सूनचं खरं आकर्षण असतं असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही, या लेखात आपण पावसाळ्याचा आनंद द्विगुणीत करणाऱ्या अशा काही सणांची माहिती घेऊ.



**सांजाव महोत्सव :** गोव्यातील सर्वात लोकप्रिय मान्सून उत्सवांपैकी एक म्हणजे सांजाव महोत्सव. हा उत्सव राज्यभर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. सेंट जॉन द बॅप्टिस्टच्या नावावरून साजरा केला जाणारा हा सण जल केंद्रित आहे. विहिरी, नद्या आणि तलावांमध्ये उडी मारून जलक्रीडा करत हा सण साजरा केला जातो.

सांजाव महोत्सव दरवर्षी 24 जून रोजी गोव्यात साजरा केला जातो. पाण्यात तरंगणारे रंगीबेरंगी फ्लोट्स, पारंपारिक संगीत, स्थानिक लोक आणि पर्यटक एकसारखे दिसणारे कोपल्स (फुलांची माळा) घालतात, यामुळे उत्सवाच्या उत्साहात भर पडते.

**सांगोड उत्सव :** मान्सून उत्सवाला सुरुवात करणारा सांगोड उत्सव, गोव्यातील मासेमारी करणाऱ्या समुदायाद्वारे साजरा केला जाणारा पारंपारिक बोट उत्सव आहे. दरवर्षी, 29 जून रोजी, गोव्यात सेंट पीटर आणि सेंट पॉल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा उत्सव साजरा केला जातो. सेंट पीटरचं या समुदायामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सणापासूनच 'रॅम्पन' मासेमारीच्या हंगामाची सुरुवात होते, आपल्या लाडक्या दर्या राजाचे आशीर्वाद घेतले जातात, विधीवत पूजा करून पुढील वाटचालीसाठी बोटी तयार केल्या जातात.

छोट्या नाव एकत्र आणून त्या एकमेकांसोबत जोडल्या जातात. नारळाच्या झावळ्या, फुले आणि रंगीबेरंगी फुग्यांनी या छोट्या नावांना सजवले जाते. चर्चची प्रतिकृती या नावेच्या मध्यभागी उभारली जाते. यावेळी हा मच्छीमार करणारा समुदाय आपल्या पारंपारिक लोकनृत्याने, संगीताच्या सादरीकरणाने प्रेक्षकांचे मनोरंजन करतात.

**चिखल कालो महोत्सव :** "द मड फेस्टिव्हल" म्हणून ओळखला जाणारा धार्मिक सण, गोव्यात पावसाळ्यात विशेषतः जूनमध्ये साजरा केला जाणारा पारंपारिक उत्सव आहे. पोंडा येथील मार्सेल गावातून उगम पावलेला, हा अनोखा उत्सव देवकी कृष्ण मंदिरास केंद्रस्थानी ठेवून साजरा केला जातो. हा उत्सव भगवान कृष्ण आणि त्याची आई देवकी यांना समर्पित आहे.

सणाची नेमकी उत्पत्ती अस्पष्ट असली तरी, गावकरी दरवर्षी मोठ्या उत्साहाने त्याचे स्मरण करतात. या उत्सवात सहभागी आनंदाने चिखलात लोळतात आणि पारंपारिक खेळांमध्ये मंत्रमुग्ध होऊन जातात. देवकी कृष्ण मंदिराशेजारी असलेले मैदान उपस्थितांचे स्वागत करत गर्दीच्या रिंगणात रूपांतरित होते.

**तौशाचे फ़ेस्त :** या विस्तृत मेजवानीच्या केंद्रस्थानी एक लक्ष्यवेधक प्रथा आहे जिथे भक्त सेंट ॲन यांना आदर म्हणून काकडी अर्पण करतात. हंगामात भरपूर प्रमाणात काकडी तयार होते त्यामुळे या हंगामात हा सण साजरा केला जातो असे म्हटले जाते. गोव्यात हंगामातील पहिली कापणी ही काकडीची केली जाते.

ख्रिस्ती धर्मगुरूंच्या निर्देशानुसार, लोक दोन काकड्या आणतात. या काकड्या मदर मेरीच्या पुतळ्याजवळ ठेवतात. उत्सवादरम्यान भेट दिलेल्या या काकड्या नंतर स्थानिक समुदाय, पुजारी आणि जवळपासच्या गावांमध्ये वाटल्या जातात. काहीजण ताज्या काकड्यांचा आस्वाद घेण्यास प्राधान्य देतात, तर काहीजण सॅलडमध्ये समाविष्ट करतात.

**बोंदेरा उत्सव :** मान्सूनच्या पावसाने निसर्ग चिंब होत असताना, दिवारचे नयनरम्य बेट बोंदेरा महोत्सवाने न्हाऊन निघते. ऑगस्टच्या चौथ्या शनिवारी आयोजित करण्यात येणाऱ्या या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे रंगीत परेड. ज्यामध्ये गावातील प्रतिस्पर्धी पाड्यांमध्ये हास्य विनोद केला जातो.

प्रत्येक गट रंगीबेरंगी झेंड्यांनी सजलेले चित्ररथाचे प्रदर्शन करतो. सुंदर चित्ररथासाठी बक्षीस आयोजित केलेले असते त्यामुळे चित्ररथांची स्पर्धा असते. या उत्सवाला पर्यटक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात, ते संगीत, नृत्य आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतात.

अशाप्रकारे गोव्याचा मान्सून म्हणजे निव्वळ बरसणाऱ्या पावसाच्या सारी एवढाच मर्यादित नाही. गोव्याची संस्कृती आणि परंपरा यांचे दर्शन घडवणारे हे उत्सव खऱ्या अर्थाने येथील मान्सूनचं आकर्षण आहे. त्यामुळे, तुमच्या बॅग पॅक करा, तुमचा आवडत्या सणाचा पोशाख घाला आणि गोव्यातील या पावसाळी उत्सवांच्या जादूमध्ये मग्न व्हा.

# थोडक्यात



## पुण्यातील अवैध पब, डान्सबार, हुक्का पार्लरवर कारवाई करा

पुणे (आरंभ पर्व) : कल्याणीनगर परिसरात घडलेल्या पोर्शे कार अपघातानंतर रात्री उशिरापर्यंत अवैधपणे सुरू असणाऱ्या पब, डान्सबार, हुक्का पार्लर, रेस्टॉरंट, पार्टी क्लब्स आणि अमलीपदार्थ तस्करीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. हुक्का, दारू आणि अमली पदार्थांचे सेवन करून पब आणि बारमध्ये नशेत झिंगणाऱ्या तरुणाईला आणि अवैध धंदे चालवणाऱ्यांना पोलीस प्रशासन आळा घालणार आहे की नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रकरणी लक्ष घालून अवैध पब, डान्सबार यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी केली. या संदर्भात जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांची भेट घेऊन सुरवसे पाटील यांनी निवेदन दिले. यावेळी सचिन मोरे, दीपक चौगुले, ज्ञानेश्वर जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते. शहरातील कोरेगाव पार्क, कल्याणीनगर, मुंढवा, घोरपडी, विमाननगर व कॅम्प परिसरात मुख्यत्वे पब, हुक्का पार्लर आणि डान्सबार मोठ्या प्रमाणात आहेत. अमली पदार्थ तस्करीचे अड्डे देखील याच भागात आहेत. पोलीस प्रशासन मात्र हफ्ते घेऊन रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या व कायद्याची पायमल्ली करणाऱ्या या अवैध धंद्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप रोहन सुरवसे-पाटील यांनी केला. रोहन सुरवसे-पाटील म्हणाले, "देशाचे भविष्य असणाऱ्या तरुणाईला बरबादीच्या खाईत लोटणाऱ्या पब आणि पार्टी कल्चरला बंद करण्याची वेळ आली आहे. नाईट लाईफच्या नावाखाली तरुण-तरुणी अमली पदार्थांच्या विळख्यात अडकले आहेत. परवानगी दिलेल्या वेळेच्या पलीकडे जाऊन पब, क्लब आणि रेस्टॉरंटचे मालक कोट्यावधी रुपयांचा नफा कमावत आहेत. पोलीस प्रशासन हफ्ते घेऊन गप्प बसत असल्याने अवैध धंद्यांना कोणीच रोखू शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना शहरातील अवैध धंद्यावर तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. आठवडाभरात कारवाई झाली नाही, तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करणार आहोत."



## 'समर्थ' उपक्रमांतर्गत दिव्यांग व्यक्तींना सहाय्यक उपकरणे प्रदान

पुणे (आरंभ पर्व) : समाजाप्रती असलेल्या आपली अथक वचनबद्धता दर्शवित ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेड (एचएमआयएल) तर्फे 'समर्थ असिस्टिव्ह डिव्हायसेस कॉन्क्लेव्ह' चे आयोजन करण्यात आले होते. ह्युंडाई मोटर इंडियाच्या 'समर्थ बाय ह्युंडाई' या सामाजिक उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात सक्षमीकरणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याची कंपनीची बांधिलकी प्रकर्षाने समोर आली . ह्युंडाई मोटर इंडिया ने,आपली एनजीओ भागीदार समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्डच्या सहकार्याने, समर्थ असिस्टिव्ह डिव्हाइसेस प्रोग्राम अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना 72 तांत्रिकदृष्ट्या प्रगत सहाय्यक उपकरणे प्रदान केली.हा कार्यक्रम ह्युंडाई मोटर इंडिया फाउंडेशन आणि समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्ड यांच्यातर्फे चालवला जातो. सहाय्यक उपकरणे पुरविण्याचा हा उपक्रम दिव्यांग व्यक्तींसाठी अधिक समावेशक जीवन निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. 'समर्थ' उपक्रमांतर्गत, एचएमआयएफ चे पुढील तीन वर्षांत 684 सहाय्यक उपकरणे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये श्रवणयंत्र, व्हील चेअर, अंधांसाठी डिजिटल किट, बायोनिक अवयव आणि इतर उपकरणांचा समावेश आहे.

# 'नॅशनल प्रिन्सिपल कॉनक्लेव्ह' संपन्न




पुणे (दै. आरंभ पर्व) सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, किवळे येथे नॅशनल प्रिन्सिपल कॉनक्लेव्हचे आयोजन करण्यात आले होते. भारतभरातील विविध उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील सुमारे 44 प्राचार्य यामध्ये सहभागी झाले होते. शिक्षणाच्या सर्वोत्कृष्ट पद्धती प्रदान करणे, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या यशस्वी कामगिरी सामायिक करणे, समान समन्वय शोधणे आणि विचारांची देवाणघेवाण करणे हे यामागचे उद्दिष्ट होते. यावेळी सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या प्र - कुलपती डॉ. स्वाती मुजुमदार यांनी विद्यार्थ्यांमध्ये उच्च रोजगारक्षमता निर्माण करणाऱ्या विद्यापीठाच्या कौशल्यावर आधारित शिक्षण प्रारूपाची माहिती दिली.

या परिषदेमध्ये नवीन काळातील कौशल्ये आणि कार्यक्रम,इंडस्ट्री फर्स्ट ॲप्रोच, एआय डिसरप्शन आणि टूवर्ड्स इंडस्ट्री 5.0 इत्यादी अनेक विषयांवर परिसंवाद आणि चर्चासत्रांचा समावेश होता.

उद्योग तज्ज्ञांनी सहभागींना उच्च विकास क्षेत्राबद्दल सादरीकरण केले. प्राध्यापक, उद्योग भागीदार आणि माजी विद्यार्थ्यांनी चर्चासत्रात सहभागी होऊन आपले विचार आणि अनुभव सांगितले. चर्चासत्रात रोजगारक्षमता, कौशल्यावर आधारित शिक्षण, कौशल्यातील अंतर भरून काढणे, नोकरीतील भूमिका व कामाची व्याप्ती, प्रशिक्षण असे विविध पैलू आणि आव्हाने या विषयांवर परिषदेत चर्चा करण्यात आली.

हा कार्यक्रम सिंबायोसिस स्किल्स युनिव्हर्सिटीच्या दोन कॅम्पसच्या तीन दिवसांच्या भेटीचा भाग होता.यामध्ये सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पुणे आणि सिंबायोसिस युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाइड सायन्सेस, इंदौर यांचा समावेश होता. यामध्ये दिल्ली, कोलकाता, जयपूर, गोरखपूर, पाटणा, लखनौ, हैदराबाद,अहमदाबाद इत्यादी देशभरातून हायस्कूलच्या प्राचार्यांनी सहभाग घेतला होता.

उच्च माध्यमिक शिक्षणामध्ये कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर देणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरण अंतर्भूत करणे या भविष्यातील मार्गाबाबत चर्चा करणाऱ्या कार्यशाळेने परिषदेचा समारोप झाला.

## 57 वर्षीय रुग्णावर यशस्वी फंडोप्लिकेशन प्रक्रिया

पुणे (दै. आरंभ पर्व) कसबा पेठ येथील समर्थ युनिव्हर्सल हॉस्पिटल येथील डॉक्टरांच्या टीमने हर्नियासह इतर गंभीर गुंतागुंत झालेल्या 57 वर्षीय रुग्णावर फंडोप्लिकेशन प्रक्रिया यशस्वीरित्या केली. उपचार करणाऱ्या टीममध्ये जनरल सर्जन डॉ.संजय शिवदे, जनरल फिजिशियन डॉ.विद्याधर शिवदे, डॉ.अनंत बागुल, भूलतज्ज्ञ डॉ.प्रसाद आंबेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.पूजा वाकडे, डॉ.स्मिता भोयर यांच्यासह कर्मचारी आम्रपाली देवडे, अनिकेत हिरवे, दीपक खुशवाहा आणि दिलीप मामा यांचा समावेश होता. आर्थिकदृष्ट्या कठिण परिस्थितीत असलेल्या व व्यवसायाने मजूर असलेला हा रुग्ण गुंतागुंतीच्या स्थितीत होता. याविषयी बोलताना भूलतज्ञ व समर्थ युनिव्हर्सल हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.प्रसाद आंबेकर म्हणाले की,जेव्हा हा रुग्ण आमच्याकडे आला होता,तेव्हा त्यांच्या पोटात व छातीत तीव्र वेदना होत होत्या.त्यांना अन्न गिळता येत नव्हते,कारण अन्न घशाखाली जात नव्हते.

परिणामी ते सहा महिन्याहून अधिक काळ पेय पदार्थ घेत होते. त्यामुळे रक्तातील प्रथिनांची पातळी कमी झाली होती (हायपोप्रोटिनेमिया) व तीव्र रक्ताशय झाला होता.त्यांची हिमोग्लोबीनची पातळी 7 ग्रॅमपर्यंत खाली आली होती.

## झोमॅटोने पुण्यात साजरा केला, 'डिलिव्हरी पार्टनर्स डे'

पुणे (दै. आरंभ पर्व) झोमॅटो या भारताच्या खाद्य पदार्थ ऑर्डर स्वीकारणाऱ्या आणि त्याची डिलिव्हरी करणाऱ्या प्लॅटफॉर्मने अलीकडेच पुण्यातील हॉटेल श्रेयस, डेक्कन जिमखाना येथे आपला 'डिलिव्हरी पार्टनर्स डे' साजरा केला. 'डिलिव्हरी पार्टनर्स डे' साजरा करण्यामागचा कंपनीचा उद्देश आपल्या डिलिव्हरी पार्टनर्सच्या अमूल्य योगदानाची दखल घेऊन त्यांचा सत्कार करण्याचा आणि त्यांच्या कुटुंबात आनंद पसरवण्याचा आहे. यामध्ये विविध श्रेणीत पुरस्कार दिले जातात. हा प्रत्येक पुरस्कार निष्ठावान डिलिव्हरी पार्टनर्सच्या लक्षणीय सिद्धीचा गौरव करतो.'डिलिव्हरी पार्टनर्स डे' सोहळ्यात सहा वेगवेगळ्या श्रेणींत, डिलिव्हरी पार्टनर्सना त्यांच्या कुटुंबियांच्या



उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा प्रत्येक पुरस्कार झोमॅटोच्या निष्ठावान डिलिव्हरी पार्टनर्सच्या असामान्य योगदानाची दखल घेणारा होता.'टॉप परफॉर्मर्स' हा पुरस्कार प्रत्येक झोनमधल्या सर्वोत्तम 10 डिलिव्हरी पार्टनर्सना, सर्वात जास्त संख्येत ऑर्डर्स डिलिव्हर करण्याच्या त्यांच्या लक्षणीय क्षमतेबद्दल देण्यात येतो.

'एव्हरीडे हीरोज' पुरस्कार अशा डिलिव्हरी पार्टनर्सना देण्यात येतो, जे दैनंदिन आयुष्यातील व्यक्तिगत समस्यांचा सामना करत असताना देखील आपले कर्तव्य चोख बजावून चिकाटी आणि निष्ठेचे उदाहरण सादर करतात.

'मेड अ डिफरन्स' पुरस्कार अशा डिलिव्हरी पार्टनर्सना प्रदान करण्यात येतो, जे ग्राहकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव टाकतात किंवा आपल्या सहकारी डिलिव्हरी पार्टनर्सना त्यांच्या अडचणीत मदत करतात आणि करुणा आणि मदत करण्याच्या वृत्तीचे उदाहरण प्रस्तुत करतात. 'इलेक्ट्रिफाईंग पार्टनर' श्रेणीत झोमॅटो अशा डिलिव्हरी पार्टनर्सचा गौरव करते, जे इलेक्ट्रिक वाहनावरून खूप मोठी अंतरे पार करून डिलिव्हरी देतात आणि शाश्वत प्रथांचा प्रचार करतात.'आयर्न लेडीज' पुरस्कार महिला डिलिव्हरी पार्टनर्सच्या निष्ठेला सलाम करतो, ज्या महिला आनंद पसरवण्यासाठी सामाजिक रुढी आणि बंधने झुगारून देतात आणि इतरांना प्रेरणा देतात.'एजलेस अचीव्हर्स' हा वय वर्ष 50 पेक्षा मोठ्या डिलिव्हरी पार्टनर्सच्या सन्मानार्थ दिला जाणारा पुरस्कार आहे, जे आपल्या ऊर्जेने आणि उत्साहाने वयाची बंधने जुमानत नाहीत आणि सेवा देण्याच्या आपल्या पॅशनची साक्ष देतात.

## 'जिद, चलते रहने की' या टॅगलाईनसह पॅरॅगॉन ब्रँडची नवी ओळख

- पॅरॅगॉनचे अभियान प्रेक्षकांच्या भावनेला साद घालते
- पॅरॅगॉन दैनंदिन नायकांना बळकट करण्यासाठी कटिबद्ध

Paragon®

पुणे (दै. आरंभ पर्व) भारताचा अग्रणी पादत्राणे ब्रँड पॅरॅगॉनने आपल्या ब्रँडची पुनः जुळवणी करण्याची घोषणा केली असून तो भारताच्या गाभ्याशी सुसंगत आणि पुन्हा जोडणारा आहे. पादत्राणांच्या बाजारपेठेत या ब्रँडची 50 वर्षे पूर्ण होत असताना हे रूपांतर घडून येत आहे. 'जिद, चलते रहने की' या टॅगलाईनसह ब्रँडची नवी ओळख सामान्य व्यक्तीच्या अदम्य चेतनेला सलाम करते. हे रूपांतर आपल्या राष्ट्रातील दैनंदिन नायकांवर प्रकाशझोत टाकते जे प्रत्येक आव्हानाचा टिकाऊपणे सामना करतात आणि आपल्या अथक भावनेतून नवीन भारत साकार करणे शक्य करतात.

या पुनः जुळवणीच्या माध्यमातून पॅरॅगॉन आपल्या व्यापक पाठिराख्यांशी असलेले बंध स्थापन करून त्यांना जवळ करत आहे. एक असा भारत आहे जो प्रखर उन्हापासून ते कुडकुडत्या थंडीपर्यंत, दिवस नि रात्र, जे करायचे आहे ते करताना कधीही थांबत नाही. या प्रवासाच्या माध्यमातून हा ब्रँड भारतीय कामगार वर्गाच्या निश्चयाचा सन्मान करतो. हा वर्ग मध्यमवर्गापासून निम्न मध्यमवर्ग तसेच स्वयंरोजगार असलेल्या व्यक्तींपासून अन्य सर्वांपर्यंत पसरलेला आहे. हे दैनंदिन जीवनातील नायक असून ते नवीन भारत घडवत आहेत.

पॅरॅगॉनचे कार्यकारी उपाध्यक्ष सचिन जोसेफ म्हणाले, "'जिद, चलते रहने की'मध्ये पॅरॅगॉनची मध्यवर्ती मूल्ये साकार झाली आहेत. भारतीय लोकांची ओळख असलेली चिवटपणा, साहस आणि न संपणारा आशावाद यांचा तो सन्मान करतो. भारतीयांच्या अविश्वसनीय चेतनेला तो मानवंदना देतो. या गुणांचे प्रकटीकरण करणाऱ्या दैनंदिन नायकांशी या अभियानाच्या माध्यमातून आम्ही पुन्हा जोडल्या जात आहोत. आम्ही त्यांच्या पाठीशी राहण्याची, त्यांना आराम व आधार देण्याच्या कटिबद्धतेची हमी देत आहोत. दीर्घकाळापर्यंत आम्ही अधिक समकालीन लोकं आणि परिस्थितीवर लक्ष केंद्रीत केले आहे. मात्र या ब्रँडशी जनसामान्यांचा असलेला भावनिक बंध लक्षात घेता पुन्हा आपल्या मध्यवर्ती गाभ्यावर लक्ष केंद्रीत करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे."

"टर्मरिक या आमच्या नवीन भागीदारासोबत आपल्या लक्षित बाजारपेठ आणि प्रेक्षकांना नेमका संदेश देणे आम्हाला शक्य झाले आहे," असे सचिन जोसेफ म्हणाले.

टर्मरिकचे सीईओ राहुल गुहा म्हणाले, "ही केवळ पुन्हा जुळवणी करण्याची प्रक्रिया नाही तर पुन्हा दावा करण्याचीही प्रक्रिया आहे. या अभियानाच्या माध्यमातून आम्ही जनसामान्यांना हे सांगू इच्छितो, की पॅरॅगॉनची प्रेरणा हे तेच असून पॅरॅगॉन त्यांची काळजी घेते आणि त्यांच्या कष्टांना दाद देते. त्यांच्या प्रवासात पॅरॅगॉन हा तडजोड न करणारा मूक भागीदार बनून राहील."

# पोकोतर्फे स्नॅपड्रॅगन 8 एस जेन 3 प्रोसेसर सह पोको एफ 6 5 जी स्मार्टफोन लॉन्च

पुणे (दै. आरंभ पर्व) जेन झी ट्रेन्ड सेटर्स च्या मिड रेंज श्रेणीतील महत्त्वपूर्ण फोन्स उपलब्ध करून देण्याच्या आपल्या वचनबध्दतेनुसार पोको तर्फे आज त्यांची एफ सिरीज सुधारीत करत भारतातील नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या एका मोठ्या कार्यक्रमात एफ6 5 जी फोनची भारतात सुरुवात करण्यात आली. दि पोको एफ 6 5जी ने भारतात प्रथमच बहुप्रतिक्षित अशा स्नॅपड्रॅगन 8 एस जेन 3 प्रोसेसर आणला असून याचे डिझाईन हे जेनझी गेमर्स,फोटोग्राफी चे चाहते आणि टेकच्या चाहत्यांसाठी विशेषरुपाने करण्यात आले आहे.पोको एफ सिरीजची बाजारपेठीय मांडणी ही




स्मार्टफोन बाजारपेठेत उच्चतम अशी कार्यक्षमता परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी अनोख्या पध्दतीने करण्यात आली आहे. ही सिरीज उपलब्ध नाविन्य, सातत्याने मध्यम रेंजच्या फोन्स मध्ये बदलणाऱ्या अपेक्षांनुसार करण्यात आली आहे. आपली परंपरा अबाधित राखत पोको एफ 6 5 जी ची निर्मिती आजवरच्या पोकोच्या अधिक कार्यक्षमतेवर आधारीत स्मार्टफोन निर्माण करण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे.

पोको इंडिया चे कंट्री हेड हिमांशु टंडन म्हणाले " पोको एफ 6 5 जी ची सुरुवात करतांना आंम्ही खूपच आनंदी आहोत, हे उपकरण म्हणजे स्मार्टफोन पेक्षा अधिक आहे. हे गेम चेंजर, खिशातील क्रांती असून यांत स्नॅपड्रॅगन 8 एस जेन3 प्रोसेसर आहे. पोको एफ 6 5 जी मुळे आम्ही मध्यम रेंजच्या स्मार्टफोन विभागात नवीन नियम आखत आहोत, यामुळे निर्भय आणि साहसी असलेल तरुण हृदयाच्या लोकांच्या इच्छा पूर्ण करत आहोत.

पोको एफ 6 5 जी मध्ये शक्तीशाली स्नॅपड्रॅगन 8 एस जेन 3 प्रोसेसर असून यामध्ये अत्याधुनिक 4 एनएम प्रोसेसर तंत्रज्ञान उपलब्ध आहे. प्रोसेसरच्या कॉन्फिगरेशन मध्ये 3.0 जीएचझेड वर चालणारा 1 कोर्टेक्स एक्स 4 कोअर, 2.8 जीएचझेड वर चालणारे 4 कोर्टेक्स ए 720 कोअर्स आणि 2.0 जीएचझेडवर चालणारे 3 कोर्टेक्स ए 520 कोअर्स यांचा समावेश आहे. पोको एफ 6 5 जी मध्ये मेमरीचे सुध्दा विविध पर्याय असून 8 जीबी रॅम सह 256 जीबी स्टोअरेज, 12 जीबी रॅम सह 512 जीबी स्टोअरेज उपलब्ध आहे. अधिक प्रमाणात मेमरी असल्याने ॲप्स साठवण्यासाठी, गेम्स, फोटोज आणि व्हिडिओज साठवण्यासाठी योग्य क्षमता मिळते. हे उपकरण महत्त्वपूर्ण अशा एलपीडीडीआर5 एक्स रॅम आणि यूएफएस 4.0 स्टोअरेज तंत्रज्ञानावर आधारीत आहे. यामुळे कार्यक्षमता आणि डेटा ट्रान्सफरची गती वाढते.

पोको एफ 6 5 जी मध्ये 6.67 इंचाचा ॲमोलेड डिस्प्ले असून यांत 1.5 के रिझॉल्युशन सह 68 बिलियन हून अधिक रंगांना सपोर्ट आहे, यामुळे गेमिंग, स्ट्रीमिंग आणि रोजच्या वापरासाठी सुंदर दृष्ये दिसतात. स्क्रीन टू बॉडी रेशिओ हा पोको

पोको एफ ६ ५ जी फोन हा भारतीय बाजारात २९ मे २०२४ रोजी दुपारी १२ पासून टायटॅनियम आणि काळ्या अशा दोन रंगात उपलब्ध असेल. याची किंमत ही ८+२५६ जीबी साठी रु २५,९९९, १२+२५६जीबी साठी रु २७,९९९ आणि १२+५१२ जीबी साठी रु २९,९९९ मध्ये उपलब्ध असेल. ही किंमत विक्रीच्या पहिल्या दिवशी उपलब्ध असून यामध्ये रु. २००० च्या बँक ऑफर्स सह रु.२००० च्या एक्सचेंज ऑफर सह उपलब्ध आहे. त्याच बरोबर ग्राहकांना सेलच्या पहिल्या दिवशी १+१ वर्षाची वॉरंटी ही देण्यात येणार आहे.

एफ 6 5 जी मध्ये 94.27 टक्के असून यासह 120 हट्र्झचा रिफ्रेश रेट, टच सॅम्पलिंग रेट हो 240 आणि गेमिंग साठी 480 हट्र्झ चा आहे तसेच चांगले स्क्रोलिंग, ॲनिमेशन्स आणि गेम प्ले साठी 2160 हट्र्झचा रेट ही आहे.

पोको एफ 6 5 जी मध्ये शक्तीशाली सोनी ओआयएस+ईआयएस कॅमेरा आणि मोठे असे एफ/1.59 अपार्चर तसेच आयएमएक्स 882 सेन्सर असल्याने सुंदर फोटो येतात. पोको एफ 6 5 जी मध्ये एआय इमेज एक्स्पान्शन, मॅजिक इरेझर प्रो, एआय बोकेह, मॅजिक कटआऊट आणि अशा अनेक सुविधा आहेत. उपकरणामध्ये विविध प्रकारचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याची सुविधा असून 60 एफपीएस ला 4 के, 30 एफपीएस ला 4 के, 60 एफपीएस ला 1080 पी, 30 एफपीएस ला 1080 पी आणि 30 एफपीएस ला 720 पी चे रेकॉर्डिंग करता येते.

पोको एफ6 5 जी मध्ये शक्तीशाली 90 वॉट टर्बो चार्जिंग सुविधा आहे ज्यामुळे वेगाने चार्जिंग होते. त्याच बरोबर फोन बरोबर 120 वॉट चार्जर मिळतो. हे उपकरण यूएसबी टाईप सी चार्जिंगने युक्त असून 5000 एमएएच (टीवायपी) ची लि आयन पॉलिमर बॅटरी देते. यामध्ये स्मार्ट चार्जिंग तंत्रज्ञान असल्यामुळे चार्जिंगची प्रकिया नियंत्रित होऊन बॅटरीचे लाईफ आणि कार्यक्षमता वाढते. यामुळे एकूणच बॅटरीचे जीवनमान वाढून काही काळानंतरही बॅटरी चांगल्या स्थितीत राहते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.